<table>
<tr><td colspan="2">जिल्हा न्यायाधीश – १, मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांच्या न्यायालयात</td></tr>
<tr><td colspan="2">संकीर्ण अधिकारक्षेत्रातील खटला क्र. २१/२०२४ (M.J.C. No. 21/2024)</td></tr>
<tr><td>CNR–MHBU11–000672–2024</td><td>श्याम केशव राखोंडे + ४<br>– विरुध्द –<br>मुख्याधिकारी, नगरपरीषद, नांदुरा</td></tr>
</table>

**निशाणी क्र. ०१ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, नांदुरा यांच्या न्यायालयातील नियमित दिवाणी दावा क्र. ४३/२०२० या प्रकरणात दिनांक १८/०४/२०२४ रोजी पारित झालेल्या न्यायनिर्णयाविरुध्द अपील दाखल करण्यास झालेल्या १७ दिवसांचा विलंब माफ होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

**२)** अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे तारीख १८/०४/२०२४ रोजी हुकूमनामा पारीत झालेला असून अपील दाखल करण्याची अंतिम तारीख १०/०६/२०२४ ही होती, मात्र या प्रकरणातील माहिती अर्जदार क्र. १ यांना होती, परंतू, अर्जदार क्र. २ त्यांच्या कुटूंबियांसह चारधाम यात्रेला गेले होते व ते तारीख २६/०४/२०२४ रोजी परत आले. ते त्यांच्या वकीलांना माहिती देऊ शकले नाही, म्हणून अपील दाखल करण्यास विलंब झालेला आहे व तो माफ होऊन मिळावा.

न्यायाधीश

**३)** गैरअर्जदार यांनी निशाणी क्र. १३ येथे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे विलंबाची दिलेली कारणे योग्य नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा, अशी त्यांनी विनंती केली आहे.

**४)** अर्जदाराने निशाणी क्र. १५ वर स्वतःची साक्ष नोंदविली. गैरअर्जदाराने कोणताही पुरावा दिला नाही.

**५)** अर्जदार यांच्याकरीता विधीज्ञ श्री. बी.के. शेख आणि गैरअर्जदार यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. आय.एफ. जैन यांचा युक्तीवाद ऐकला.

**६)** अर्जदार यांचे विधीज्ञ यांनी असे कथन केले की, या प्रकरणात विलंब माफ होवून अपील दाखल न झाल्यास अतिशय नुकसान संभवते. सदरचा विलंब त्यांनी जाणीवपूर्वक केलेला नाही. विलंब करण्यामागे त्यांचा कोणताही हेतू नव्हता. खटल्यात मालमत्तेचा अधिकार गुंतलेला आहे आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार त्याचा अधिकार प्रस्थापित करण्यासाठी वाजवी संधी दिली पाहिजे आणि तांत्रिकतेला महत्त्व देऊ नये. अर्जात नमूद कारणांसाठी अर्जदार यांनी स्वतःची साक्ष घेतली आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्जातील मजकूर मान्य करण्यात यावा. सदरचा विलंब माफ न झाल्यास अर्जदार यांचे न्याय हक्कांवर गदा येणार आहे व त्यांचे पैशांचे स्वरुपात भरुन येणार नाही असे नुकसान होणार आहे. सदर विलंब हा अर्जदार यांच्या निष्काळजीपणामुळे किंवा हलगर्जीपणामुळे झालेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास गैरअर्जदार यांचे कोणतेही नुकसान

होणार नाही. त्यामुळे या सर्व कारणास्तव अर्जदार यांस अपील दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन अपील दाखल करुन घेण्याची अर्जदार यांनी विनंती केली आहे.

७) गैरअर्जदार यांचे विधीज्ञ यांनी असे कथन केले की, अर्जदार क्र. १ माहितगार असतांना व ते चारधाम यात्रेला गेले होते, असे अर्जदारांचे म्हणणे नसतांना अर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या वकीलांना भेटून माहिती का दिली नाही व अपील का दाखल केले नाही, हे अर्जदारांनी स्पष्ट केले नाही. त्यांचे असेही कथन आहे की, अर्जात वैद्यकीय कागदपत्र सोबत जोडले असल्याचे नमूद केले आहे, मात्र अर्जदारांनी कोणतीही वैद्यकीय कागदपत्र दाखल केलेली नाहीत. या परिस्थितीत अर्जदार स्वतःच्या प्रकरणासंदर्भात गंभीर नाहीत व त्यांनी विलंब योग्यप्रमाणे स्पष्ट केला नाही, म्हणून त्यांचा अर्ज खर्चासह रद्द करावा, असा गैरअर्जदारांतर्फे युक्तीवाद करण्यात आला.

८) अर्जदार क्र. १ सुध्दा चारधाम यात्रेला गेले होते, मात्र टंकलेखनीय चुकीमुळे अर्जदार क्र. १ ऐवजी अर्जदार क्र. २ असे नमूद करण्यात आले आहे व सदरचा अर्ज कॉपी-पेस्ट करतांना चुकून वैद्यकीय प्रमाणपत्राबाबत मजकूर राहून गेल्याचे अर्जदारांच्या विद्वान वकीलांनी स्पष्ट केले. सदरच्या चुका लक्षात घेता, सदरचे स्पष्टीकरण योग्य दिसून येते. उपरोक्त परिस्थितीत अर्जदारांनी दिलेल्या साक्षीवर अविश्वास दाखविता येणार नाही. अर्जदार क्र. १ कुटूंबासह चारधाम यात्रेला गेल्याची बाब व विलंब केवळ काही दिवसांचाच असल्याची बाब लक्षात

घेता गैरअर्जदाराला रक्कम रुपये १,०००/– खर्च देण्याच्या अटीवर विलंब माफ केल्यास, तो योग्य व न्यायोचित होईल. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :–

## आदेश

१) विलंब माफीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, नांदुरा यांच्या न्यायालयातील नियमित दिवाणी दावा क्र. ४३/२०२० या प्रकरणात दिनांक १८/०४/२०२४ रोजी पारित झालेल्या न्यायनिर्णयाविरुध्द अपील दाखल करण्यास झालेला विलंब, अर्जदार यांनी खर्चापोटी गैरअर्जदार यांना रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रुपये एक हजार मात्र) आदेशाच्या तारखेपासून दोन आठवड्यांच्या आत देण्याच्या अटीवर, क्षमापित करण्यात येत आहे.

३) दोन आठवड्यांच्या आत खर्चाची रक्कम दिल्यास/भरल्यास कार्यालयीन छाननीअंती अपीलाची नोंदणी करण्यात यावी.

४) किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २१/२०२४ निर्णयीत करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PURUSHOTTAM BHAURAO JADHAV
Date: 2026.05.06 16:47:04 +0530

मलकापूर.
दिनांक – ०६/०५/२०२६.

**(पुरुषोत्तम भा. जाधव)**
जिल्हा न्यायाधीश–१,
मलकापूर.

– – – – –

## प्रमाणपत्र

मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेश हा मूळ आदेशाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | जिल्हा न्यायाधीश – १, मलकापूर. |
| लघुलेखकाचे नांव | :- | कु.एच.डी.चौधरी, लघुलेखक श्रेणी-१. |
| आदेश पारीत केल्याचा दिनांक | :- | ०६/०५/२०२६. |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०६/०५/२०२६. |